स्थापना १९५२ नोंदणी क्रमांक २०२७२

**दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई**
**म्युनिसिपल बँक भवन, २४५ पी.डि'मेलो रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

मुंबई, दिनांक : १४.०८.२०१९

**नोटीस**

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांची सदुसष्ठावी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक ३० ऑगस्ट २०१९ रोजी, सायंकाळी ६.०० वाजता श्री शिवाजी मंदिर, न.चिं. केळकर पथ, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८ येथे खालील कामकाजांचा विचार करण्याकरीता आयोजित करण्यात आली आहे :-

१) दिनांक २७.०७.२०१८ रोजी झालेल्या ६६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे.

२) संचालक मंडळाने सादर केलेल्या वार्षिक अहवालास व वैधानिक हिशेब तपासनीसांनी तपासलेले दि.३१ मार्च २०१९ अखेरचे नफा-तोटा पत्रक व ताळेबंद यांस मान्यता देणे.

३) दिनांक ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ या कालावधीकरीता वैधानिक हिशेब तपासनीस यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेणे व सन २०१७-२०१८ च्या वैधानिक हिशेब तपासणी अनुपालन अहवालाची नोंद घेणे.

४) २०१९-२०२० या आर्थिक वर्षाचे आपल्या बँकेचे वैधानिक लेखा परिक्षण (Statutory Audit) करणेकरीता मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या नामतालिकेमधील, लेखा परिक्षकांची (ऑडीटर्सची) नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

५) नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.

६) बँकेची वसुल न होणारी कर्जे जामिनकी हमी निधी खाते नांवे टाकून निर्लेखित करणे.

७) सुधारीत जामिनकी हमी निधी नियमास मान्यता देणे.

८) पोटनियम क्रमांक ५२ (५) मध्ये सुधारणा करणेबाबत.

९) ६७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील सभासदांची गैरहजेरी माफ करणे.

१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने, नियमांस अनुसरुन, आयत्यावेळी येणा-या कामकाजाचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या हुकूमावरुन

**वि.ही. रावदका**
**महाव्यवस्थापक**

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४.०८.२०१९

# <u>सूचना</u>

१) सर्वसाधारण सभेच्या निश्चित केलेल्या वेळी गणसंख्या पूर्ण न झाल्यास सभा तहकूब करण्यात येईल. अशी तहकूब झालेली सभा त्यानंतर अर्ध्या तासाने त्याच दिवशी, त्याच ठिकाणी घेण्यात येईल व आवश्यक त्या गणसंख्येच्या अभावीसुध्दा कामकाजाचा विचार केला जाईल.

२) सभासदांना वरील कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाजासंबंधी काही माहिती हवी असल्यास त्यांनी कामाच्या वेळेत, मुख्य कार्यालयात, महाव्यवस्थापक यांना पूर्वसूचनेनुसार भेटावे.

३) वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुलभ होण्याच्या दृष्टीने सभासदांनी त्यांना हव्या असलेल्या माहितीबाबत सभेपूर्वी ७ दिवस अगोदर लेखी सूचना द्यावी व सभेच्या वेळी संबंधीत विषयावरील चर्चा चालू असताना त्याबाबत विचारणा करावी. आयत्यावेळी विचारलेली माहिती देणे शक्य होणार नाही.

४) दिनांक २७.०७.२०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत त्याचप्रमाणे सन २०१८-२०१९ वैधानिक हिशेब तपासनीसांचा अहवाल व सन २०१७-२०१८ चा वैधानिक हिशेब तपासणी अनुपालन अहवाल सभासदांच्या अवलोकनासाठी दिनांक १४.०८.२०१९ पासून कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत बँकेच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात येईल. तसेच बँकेच्या सर्व शाखांमध्ये मागील सभेच्या इतिवृत्तांताच्या प्रती दिनांक १४.०८.२०१९ पासून सभासदांच्या अवलोकनासाठी कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत ठेवण्यात येतील.